EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# नाटक: व्यक्तीच्या आंतरबाह्य व्यक्तीमत्व विकासाचे प्रभावी माध्यम..!

**हर्षवर्धन सुधाकर तायडे**
तक्षशिला महाविद्यालय, अमरावती
रा. साईधाम नागरी, आजंती रोड, नेर (प.) ता. नेर जि. यवतमाळ – ४४५१०२

## प्रस्तावना

नाट्य हा शब्द 'नट' या शब्दापासून बनलेला आहे. नटाची जी कामगीरी असते ते नाट्य. नट शब्द नट् नाचणे किंवा अभिनय करणे या धातूवरून आला आहे. नाटकामध्ये मानवी विकारांचे आणि विविध अवस्थांचे कलात्मक अनुकरण केलेले असते, नृत्य, साभिनय नृत्य, रूप बदलणे अशा कला म्हणजे नाट्य होय. नाट्य म्हणजे नटाची अभिनय कला होय. निसर्ग किंवा लोकस्वभाव हा नाट्याचा मुख्य आधार असून, आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक अशा चार अभिनयांनी अत्यंत सुंदर कलाकृती लोकांपुढे सादर करणे म्हणजे नाटक होय. अश्या ह्या नाट्यप्रकारामधून व्यक्तीचा आंतरबाह्य विकास होत असतो.

## नाटक म्हणजे काय?

नाटक हा एक वाङ्मय प्रकार असून नाटक वाचतांना सुद्धा वाचक दृश्य स्वरूपाचा अनुभव घेत असतो. नाटक सादर करणे ही एक आंगिक कृती आहे. नाटकातील पात्र संवादाच्या माध्यमातून नाटक साकारत असतात. म्हणून नाटक बघतांना प्रेक्षकांना त्याचा भास होत असतो. नाटक हे एक दृकश्राव्य कलाप्रकार असल्याने प्रभावीपणे प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेते. नाटक प्राचीन कलाप्रकार असून यात काळानुसार बदल झाल्याचे दिसून येते. "नाटकाला इंग्रजीत मध्ये Drama असे म्हणतात. मूळ ग्रीक शब्द Dran वरून Drama हा शब्द रुढ झाला. Dran म्हणजे कृती करणे. कृती दोन प्रकारची असते. एक सांगितलेली कृती आणि दुसरी केलेली कृती. ग्रीक कथेमध्येही 'मायथॉस' Mythos आणि 'ड्रॅमेनॉन' Deamenon असे दोन वेगवेगळे शब्द वापरले जातात. नाटकातील पात्रे कृती करतात. म्हणून पाश्चात्य मंडळीसुद्धा नाटकाला केवळ वाङ्मयप्रकार मानत नाही, तो एक आविष्करणात्मक कलाप्रकार आहे. असेच मानतात, हे Drama शब्दाच्या योजनेवरून लक्षात येते."[१] म्हणूनच नाटकाला इंग्रजीमध्ये Drama असे म्हटल्या जाते. या नाटकाची व्याख्या अनेक विचारवंतांनी केली आहे. ती पुढील प्रमाणे बघता येईल परंतु ती परिपूर्ण असेलच असे नाही. नाटकाचे विशेष पुढील व्याख्येवरून लक्षात येईल.

## नाटकाची विविध व्याख्या

"त्रैलोक्यस्यास्य सर्वस्य नाट्यं भावानुकीर्तनम्।"[२]

अर्थात संबंध त्रैलोक्याच्या भाव-भावनांचे वर्णन नाट्यात केले जाते अशी व्याख्या भरतमुनींनी नाट्यशास्त्राच्या पहिल्याच अध्यायात केली आहे.

प्रसिद्ध विचारवंत सिसरोने नाटकाची पुढील प्रमाणे व्याख्या केली आहे तो म्हणतो, "नाटक हे जीवनाचे अनुकरण आहे, चालीरितीचा आरसा आहे, सत्याचे प्रतिबिंब आहे।"[३]

वि.वा. शिरवाडकर व पु.ल. देशपांडे म्हणतात, "नाटक हा एक साहित्यप्रकार आहे. साहित्यानुभव आणि रंगानुभव यांची सांगड घालणे हे नटाचे काम आहे आणि रंगमंचावरून संहिता प्रकट होणार आहे याची जाणीव ठेवून ती तशी लिहिणे हे नाटककाराचे काम आहे"[४]

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

डॉ. भालचंद्र फडके, विश्वकोषाच्या आठव्या खंडात म्हणतात, "नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्या द्वारे व्यक्त होणारा संघर्षमय कथात्म अनुभव" असे म्हणता येईल "नाटक म्हणजे माणसाच्या अंतर्बाह्य क्रिया-प्रतिक्रियांमध्ये दर्शन घडविणारा आकृती बंध होय."[५]

नाटकाच्या वरील व्याख्या मधून आपल्या लक्षात येते की, नाटक हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून ते एक समाजप्रबोधनाचे सुद्धा माध्यम आहे. नाटकाद्वारे व्यक्तीच्या अंतर्बाह्य विकास घडून येतो. पुढील मुद्याच्या आधारे बघता येईल.

**नाटकाचे वाङ्मयीन वेगळेपण :** कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, लघुकनिबंध हे ज्याप्रकारे स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे त्याप्रकारे नाटक हे सुद्धा भिन्न वाङ्मय प्रकार आहे. नाटक हे त्याच्या निर्मिती प्रक्रियेमुळे इतर सर्व वाङ्मय प्रकाराहून वेगळे ठरते. नाटकाची निर्मिती ही सादरीकरणासाठी केली जाते. नाट्यप्रयोगाची कलात्मकता व नाटकाचे तंत्र अशा दोन पातळीवरून नाटक सादर केले जाते. नाटकाचे वाङ्मयीन वेगळेपण असल्यामुळे त्याचे वाङ्मयीन व तांत्रिक असे दोन घटक पडतात.

**नाटकातील वाङ्मयीन घटक :** नाटक हे प्रेक्षकांपुढे सादर करायची कलाकृती असल्यामुळे नाटककाराला एक मध्यवर्ती कथानक घेऊन अनुभवाच्या, कल्पनेच्या पातळीवर लिहीत असतांना नाट्यतंत्र सुद्धा लक्षात घेणे आवश्यक असते. दोन पात्रातील नाते संबंध न सांगता केवळ पात्राच्या संवादातून प्रेक्षकांच्या लक्षात आणून द्यावे लागते. नाटककार नाटक लिहितांना तो स्वतः नाटक बघत असतो. नाटककार केवळ लेखक असून चालत नाही तर तो एक चांगला अभ्यासक, एक कलावंत, सामाजिक भान असलेले व्यक्तीत्व, नाट्यतंत्राची जाणीव असलेला कलावंत सुद्धा असणे आवश्यक आहे. नाटकाचे कथानक किंवा विषयसूत्र नाटककाराला आपल्या डोक्यात ठेवून कथा रूपाने पात्रांच्या संवादाच्या मदतीने नाटक पुढे पुढे सरकत जाते. नाटकात येणाऱ्या विषयाकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघावे हे नाटककार निश्चित करीत असतो. नाटककार एखादी घटना किंवा गोष्ट सांगण्यासाठी योग्य प्रकारे कथानकाची मांडणी करीत असतो. नाटकाचे कथानक हे नाटकाचा मुख्य आत्मा असतो. नाटकाच्या वाङ्मयीन घटकात बीज, कथानक, विषयसूत्र, नाट्यसंहिता, संवाद इत्यादी महत्वाचे असतात. नाट्य सादर करतांना या वाङ्मयीन घटका बरोबरच तांत्रिक घटक सुद्धा महत्वाचे आहे.

**नाटकातील तांत्रिक घटक :** नाटक सादर करतांना नाटकातील तांत्रिक घटक हे सुद्धा महत्वाचे असतात. नाटकाला आधीक चांगल्या प्रकारे प्रेक्षकांपुढे सादर करण्याकरिता चांगल्या रंगमंचाची आवश्यकता असते. त्यासोबत प्रकाश योजनेद्वारे अर्थपूर्ण प्रकाश नाटकातील प्रसंगानुसार व स्थळ, काळानुसार रंगमंचावर व पात्रावर टाकण्यात येतो त्यामुळे नाटक आधीक चांगल्या प्रकारे सादर होते. संगीत संयोजन हे सुद्धा तितकेच महत्वाचे आहे त्यामुळे नाटकातील प्रसांगाला संवादानुसार पार्श्वसंगीत देऊन नाट्यात रसनिर्मिती प्रभावीपणे केली जाते. पात्राच्या वेशभूषेतून व वेशभूषेतून त्याचे व्यक्तीत्व प्रेक्षकांच्या लगेच लक्षात येते तर नेपथ्य रचनेवरून प्रसंग कोणता आहे हे प्रेक्षकांच्या लक्षात येते. अर्थात वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा, नेपथ्य, प्रकाश योजना व संगीत ह्या बाबी तांत्रिक स्वरूपाच्या असल्या तरी सुद्धा रंगमंचावरील पात्रांनी सादर केलेल्या कलाकृतीला नाट्यरूप प्राप्त करून देत असते. या सर्व तांत्रिक कृतीमुळे नाटक प्रभावीपणे सादर होत असते.

**नटाची कृती :** नाटकात नट हा अत्यंत महत्वाचा असतो. नट आपल्या अभिनयाच्या जोरावर नाट्यकृतीला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवीत असतो. नट किंवा अभिनयकर्ता आपला अभिनय सादर करतो तेव्हा चार प्रकारचे अभिनय सांगण्यात आले आहेत.

**वाचिक अभिनय :** नट अभिनय करतांना वाचिक अभिनयाच्या माध्यमातून आपली भूमिका साकारत असतो. नाट्य संहितेनुसार आपल्या संवादातून, आवाजाच्या चढ-उतारातून नट आपले पात्र साकारत असतो. नटाचे शब्दउच्चारण रेखीव किंवा योग्य असले पाहिजे, शब्दावरील आघात चुकता कामा नये जर हे चुकले तर नाट्य निर्मितीच्या यशाला ते बाधक ठरते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**आंगिक अभिनय :** शरीराच्या वेगवेगळ्या हालचाली मधून आंगिक अभिनय घडत असतो. आंगिक अभिनयात नटाला रंगमंचावरील शारीरिक हालचालीकडे लक्ष देणे आवश्यक असते. चुकीच्या पद्धतीने शरीराची हालचाल केली तर ते नाटकासाठी बाधक ठरते.

**सात्विक अभिनय :** सत्व हा मानवी शरीराचा सर्वात महत्वाचा गुण आहे. मानव प्राणी ज्या भावनात्मक अवस्था अनुभवतो त्या शरीराच्या सहवासात असल्यामुळे सत्वापासून उदय पावतात. सत्व हे मनात उगम पावते ते मनाची समतोल अवस्था दर्शविते. सात्विक अभिनयाचा परिणाम मनाच्या एकाग्रतेतून साधला जातो. परंतु तो वाचिक नसतो. विशुद्ध आंगिक नसतो. शरीर हालचाली ह्या विशिष्ट कृतीशी संबंधीत असतात. सात्विक अभिनय सहज मनोवस्थेचा शारीर आविष्कार आहे.

**आहार्य अभिनय :** यात नटाच्या वेशभूषा अपेक्षित आहे. नाट्यशास्त्रात पात्राने वापरावयाच्या अलंकाराचे विस्ताराने वर्णन केले आहे. वेगवेगळे वेश मुकुट व माळ इत्यादींचा समावेश यात होतो. उदा. राजाची वेशभूषा व भिक्षेक-याची वेशभूषा यावरून चटकन लक्षात येईल की कोण कोणते पात्र सकारात आहे. हे चार प्रकारचे अभिनय असून हे अभिनय करतांना नवरस सुद्धा तितकेच महत्वाचे आहेत. या नवरसातूनच अभिनेत्याच्या किंवा नटाच्या अभिनयाला यश प्राप्त होत असते.

**नवरस :** भरतमुनींच्या नाट्यशास्त्र ग्रंथ निर्मितीपूर्वीच म्हणजेच इ.स.पुर्व पहिल्या दुसऱ्या शतकापूर्वी रससिद्धांत मांडण्यात आला आहे. भरतमुनींनी एकूण आठ रस सांगितले आहे. त्यामध्ये शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बिभत्स, अद्भुत, हे ते आठ रस. परंतु आठव्या शतकात अभिनव गुप्ताने नववा शांत रस यात जोडला या काळापर्यंत बुध्द धम्म व जैन धर्मामुळे शांत रसाला महत्व प्राप्त झाले होते म्हणून पुढे नवरस झाले. नवरसाची नाट्यातून आधीकाधिक उधळण झाली की नाट्य यशस्वी होते कारण प्रेक्षक नवरसाचा आनंद घेत असतो. याच घटकातून व्यक्तीचा अंतर्बाह्य विकास होत असतो.

**नाटकांतून व्यक्तीचा आंतर-बाह्य विकास :** नाटकातील प्रत्येक घटकामधून व्यक्तीचा विकास होत असतो. प्राचीन भारताच्या इतिहासातील पहिला नाटककार अश्वघोष हा एक उत्तम नट होता, तो दिग्दर्शक व नाटककार होता. तो नेपथ्यकार, रंगभूषाकार, संगीत संयोजक सुद्धा होता. कारण हे सर्व त्याच्या नाटकाची गरज होती. आवश्यकतेनुसार त्याने त्या त्या गोष्टी उभ्या केल्या. ठिक त्याच प्रकारे कमी अधीक प्रमाणात नाट्य कलावंतांना सुध्दा नाटकात भूमिका करताना अनेक गोष्टी कराव्या लागतात .

**व्यक्तीचा बाह्य विकास :** बाह्य विकास म्हणजे व्यक्तीची केशभूषा, रंगभूषा, वेशभूषा हे होय. नाटकात भूमिका करणाऱ्या व्यक्तीला बाह्य गुणांचा अभ्यास होतो. नाटकातील लोक नीटनेटका पेहराव परिधान करून योग्य केशभूषा-रंगभूषा करतात. याचा प्रभाव नाट्यकलावंताच्या व्यक्तिगत जीवनावर होत असतो. व्यक्तीमत्व विकासात वेशभूषा, केशभूषा अत्यंत महत्वाची आहे. नाटकात भूमिका केल्याने बाह्य वर्णनात सकारात्मक बदल होत असतात.

**आंतर विकास** व्यक्तीमत्व विकासात आंतर विकास हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. नाटकात भूमिका केलेल्या व्यक्तीला अभिनय प्रकार व नवरस माहीत असतात म्हणून व्यक्ती त्या त्या वेळी स्वतःच्या वर्तनात नवरस उतरवत असतात. आंगिक अभिनय अभ्यासातून व्यक्तीचे चालणे, उठणे, बसणे व त्यासोबत त्याची सर्व बॉडी लँग्वेज किंवा देह बोली विकसीत होत असते.

**व्यक्तीमत्व विकासाचे टप्पे :** व्यक्तीमत्व विकास याचा अर्थ व्यक्तीमधील सुप्त गुणांना बाहेर काढून त्या गुणांच्या आधारे व्यक्तीचा आंतर बाह्य परिक्षम विकास करणे हा होय. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश करता येतो व व्यक्तिमत्व विकासाचे हे टप्पे नाटकाच्या माध्यमातून साधता येतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**स्वतः बद्दल :** आपल्या क्षमता म्हणजेच आपल्यातील क्षमता व उणीवा ओळखणे, नवनविन स्किल शिकणे, शारीरीक आरोग्य व मानसिक आरोग्य याला सकारात्मक वळण लावणे. आपले ध्येय निश्चित करून छोटे छोटे निर्णय घेऊन यशस्वी वाटचाल करणे.

**नात्या संबंधी** : आपल्यातील संवाद कौशल्य विकसीत करणे व समोरच्याचे ऐकून घेणे. भावनिक निर्णयावर संयम ठेवणे राग, द्वेष,मत्सर,हेवा, तान तणाव इत्यादीवर नियंत्रण ठेवणे. समूहाने कार्य करण्याची क्षमता विकसीत करणे.

**समाजासाठी सकारात्मक कार्य :** व्यक्ती ज्या ज्या चांगल्या गोष्टी शिकतो. त्या समाजातील इतर घटकांपर्यंत पोहचविणे. स्वतः जबाबदारी स्विकारून नेतृत्व गुण विकसीत करणे, आपल्या कार्यातून आपली ओळख निर्माण करणे.

**नाटकाद्वारे व्यक्तीमत्व विकास** : नाटकात आपण विविध भूमिका साकारतो अभिनय करतो त्यामधून आपल्या व्यक्तीत्वाचे गुण वाढीस लागतात.

**आत्मविश्वास वाढतो** : अनेकांना स्टेजवर उभे राहून बोलता येत नाही अशावेळी नाटकात भूमिका केल्याने आत्मविश्वास वाढतो व स्टेज डेअरिंग वाढते.

**संभाषण कौशल्य वाढीस लागते :** नाटकात भूमिका करतांना आवाजातील चढ-उतार आरोह-अवरोह, देहबोली, शब्द सामर्थ्य इत्यादी सुधारते याचा वापर व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात होत असतो.

**भावनिक क्षमता विकसीत होते :** नाटकात वेगवेगळी भूमिका साकारल्यामुळे त्या त्या जागी स्वतःला ठेवून दुसऱ्याच्या भावना समजून घेण्याची भावनिक क्षमता विकसीत होते.

**सांघिक भावना निर्माण होते :** नाटक हे समूहाने करायचे असल्याने नाटकातील सर्व कलावंत एकत्रित येऊन नाट्य निर्मितीचे कार्य सोपे करतात त्यामुळे समूहात कार्य करण्याची भावना विकसीत होते.

**स्मरणशक्तीचा विकास :** नाटकात संवाद पाठ करावे लागतात त्यामुळे स्मरणशक्ती वाढीस लागते.

अशा प्रकारे नाटकामधून व्यक्तीमत्व विकास घडून येत असतो. नाटक व्यक्तीच्या जीवनात अनेक प्रकारचे सकारात्मक बदल घडवून आणते म्हणून नाटकाच्या माध्यमातून व्यक्तीचा आंतरबाह्य विकास होतो.

## निष्कर्ष

नाटक व्यक्तीच्या आंतरबाह्य विकासाचे प्रभावी माध्यम आहे.

नाटकामुळे विविध विषयाचा अभ्यास होतो.

नाटकामुळे आवाजातील आरोह अवरोह कळते .

अभिनयाच्या प्रकारामुळे व्यक्तीमत्व विकासात भर पडते

नवरसामुळे अभिनय क्षमता विकशित होते.

नाटकात भूमिका केल्याने व्यक्तीमत्व विकासाचे टप्पे लक्षात येतात.

## संदर्भ

यचममुविद्यापीठ पुस्तक - २ नाटक, प्रकाशक कुलसचिव प्र.आ. २००२ पृ. ५

खांडे विलास, नाटक आणि रंगभूमी परिभाषा संग्रह, महा.राज्य साहित्य संस्कृती मंडळ २०२० पृ. २२

य.च.म.मु.विद्यापीठ पुस्तक - २ नाटक प्रकाशक प्र.आ. २००२ पृ. ६

तत्रैव पृ. ६

तत्रैव पृ. ६